आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८,०५ वाजता
१४ मे २०२५ -बुधवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र सरकारचा, ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सशी  महत्त्वपूर्ण सामंजस्य करार

- गेल्या महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर घसरुन ८५ शतांश टक्क्यावर

- राज ठाकरे यांच्या प्रस्तावाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा सकारात्मक प्रतिसाद

- भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी

**आणि**

- खेलो इंडियामधे १४२ पदकांसह महाराष्ट्र अव्व्लस्थानी कायम

**<><><><><><>**

महाराष्ट्र सरकारनं आज ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्याशी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार  केला. या करारानुसार राज्यात दहाहून अधिक औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स पार्क उभारले जाणार आहेत. यासाठी नागपूर, मुंबई, चाकण, खंडवा, सिन्नर, पनवेल याठिकाणी ७९४ एकरपेक्षा जास्त जमीन अधिगृहित केली जाईल. या सर्व प्रकल्पांमधे ५ हजार १२७ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक केली जाणार आहे. या पार्कमुळे प्रत्यक्ष

आणि अप्रत्यक्ष असे २७ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. हा करार जागतिक दर्जाचे पर्यावरणस्नेही औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स हब तयार करण्याच्या दिशेनं टाकलेलं पाऊल आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.

<><><><><>

मुंबई मेट्रोच्या कामापैकी ५० किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर ६२ किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिलं. फडनवीस यांच्या उपस्थितीत दहिसर ते काशीगाव या मेट्रोच्या टप्प्याची तांत्रिक तपासणी आज झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. हा टप्पा प्रवाशांसाठी खुला झाल्यावर पश्चिम द्रुतगती मार्गावरची वाहतूक कोंडी कमी व्हायला मदत होईल, असं फडनवीस म्हणाले. विविध ठिकाणचे मेट्रो मार्ग एकमेकांशी जोडण्याचं कामही सुरू असून यामुळे मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रात प्रवास करणं सोयीचं होईल, असंही त्यांनी सांगितलं. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचं स्थानक असून त्याच्याशी मेट्रो जोडण्याची आखणीही सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित भारताचा महागाई दर गेल्या महिन्यात कमी होऊन ८५ शतांश टक्क्यावर आल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. मार्च महिन्यात हा दर अडीच टक्के होता. खाद्यान्न, इंधन, दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती घटल्याने महागाई दरात घट झाली आहे. खाद्यान्न निर्देशांकावर आधारित महागाई दर कमी होऊन

२ पूर्णांक ५५ शतांश टक्के झाला आहे. गेल्यावर्षी तो ४ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतका होता. अन्न उत्पादनाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे महागाई दरात घट झाल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबरोबर जाण्याच्या प्रस्तावाला आपल्या पक्षाचा सकारात्मक प्रतिसाद असून भविष्यातही राहील, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितलं. नाशिक इथं आज ते वार्ताहरांशी बोलत होते. राज ठाकरे यांच्याबरोबर जाण्यासाठी महाराष्ट्रद्रोह करणाऱ्यांशी संबंध ठेवू नये एवढीच अट राहील असं सांगून ते म्हणाले, की राज ठाकरे यांच्यासाठी आपल्या पक्षाचे दरवाजे उघडे आहेत.
राज्यातल्या महानगरपालिका प्रशासकांच्या ताब्यात असल्याने स्थानिकांचे प्रश्न कायम आहेत, त्यामुळे लौकरात लौकर महानगरपालिका निवडणुका घेतल्या पाहिजेत असं ते म्हणाले.

**<><><><><>**

दक्षिण मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज मुंबई भाजपाने तिरंगा यात्रा काढली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यात सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूरमुळे भारतीय सैन्याची शक्ती जगाला समजली, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ही तिरंगा यात्रा सैन्यदलाच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी आहे, असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><>**

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी आज नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

**होल्ड -बाईट**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला,  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर सदस्य, आणि सर्वोच्च न्यायालयातले इतर न्यायाधीश या समारंभाला उपस्थित होते.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत, आज महाराष्ट्राची एकूण पदक संख्या १४२ झाली आहे. सध्या ५४ सुवर्ण, ४४ रौप्य आणि ४४ कांस्य पदकं मिळवून महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर कायम आहे. ३० सुवर्ण आणि २३ रौप्य पदकांसह ९६ पदकं मिळवून हरयाणा दुसऱ्या तर राजस्थान ५२ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. कर्नाटकाकडेही ५२ पदकं असली तरी सुवर्ण पदकांची संख्या कमी असल्याने त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं आहे. खेलो इंडिया स्पर्धेचा आज ११वा दिवस असून उद्या समारोप होईल.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात जेवर विमानतळाजवळ सेमीकंडक्टर उत्पादन कारखाना सुरु करण्याचा प्रस्ताव आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केला. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. एचसीएल आणि फॉक्सकॉन या कंपन्यांबरोबरचा हा संयुक्त

प्रकल्प असून त्यात ३ हजार ७०० कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित आहे. देशभरातल्या २७० शैक्षणिक संस्थांमधे आणि ७० स्टार्टअप्समधे जागतिक दर्जाच्या आरेखन तंत्रज्ञानाविषयी नवीन संशोधन सुरु आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

छत्तीसगढच्या विजापूर जिल्ह्यात करेगुट्टा इथे गेल्या २१ दिवसांपासून सुरू असलेल्या माओवादविरोधी कारवाईत ३१ माओवादी ठार झाले आहेत. यात १६ महिला माओवाद्यांचा समावेश आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे महासंचालक ज्ञानेंद्र प्रताप सिंह यांनी आज विजापूर इथ वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. गेल्या महिन्यात २१ तारखेपासून ते ११ मे पर्यंत चालवण्यात आलेल्या या कारवाईत एकूण २१ चकमकी झाल्या. या काळात सेल्फ लोडिंग प्रकारच्या रायफल्स, शस्त्रं तसंच साडेचारशे आयईडी जप्त करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली. याशिवाय माओवाद्यांची लपण्याची ठिकाणं तसंच २१४ बंकरही उद्ध्वस्त करण्यात आले.

<><><><><>

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराजांना वंदन केलं. नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनामध्ये तसंच, महाराष्ट्र परिचय केंद्रात आज संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. छत्रपती संभाजी महाराज जयंतीचं औचित्य साधून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी

महाराज अध्यासन केंद्राचं  उद्घाटन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या हस्ते झालं. किल्ले पुरंदर इथं छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. पुरंदर किल्ल्यावरची माची आणि छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झालेल्या वाड्यांच्या भिंतीची पुनर्बांधणी, संवर्धन आणि जतनाच्या अनुषंगानं लष्कराशी चर्चा करून सकारात्मक प्रयत्न करू, अशी ग्वाही शेलार यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

देशाच्या तिन्ही संरक्षण दलांच्या मुख्य अधिकाऱ्यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. संरक्षणदल  प्रमुख जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल ए.पी. सिंग, आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी राष्ट्रपतींना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. दहशतवादाचा मुकाबला करताना सेनादलांनी दाखवलेल्या समर्पण आणि शौर्याचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं.

**//<><><><><>//**